


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६७ वा | गुरुवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# अस्मानी दुष्काळ, सुलतानी कर्जबोजा; घोषणांच्या उधळपट्टीत महाराष्ट्राची कोंडी !

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** संकट अस्मानी असते. किंवा सुलतानी. अस्मानी म्हणजे नैसर्गिक. अतिवृष्टी, भूकंप इत्यादी. यात सरकार काहीच करू शकत नाही. सुलतानी म्हणजे सत्ताधीशांच्या चुकीच्या धोरणांमुळे ओढवते ते. ही दोन्ही संकटे ज्या वेळी एकत्र येतात त्या वेळी काय होते याचा अनुभव आता आपणास येईल. सवंग लोकप्रिय घोषणांच्या मागे लागू नये, असा धोक्याचा इशारा यापूर्वीच रिझर्व्ह बँक तसेच केंद्रीय अर्थ खात्याने अनेकदा दिला होता. पण मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी बहिणी, भाऊ सर्वांना खूश केले जाते. राज्यातील महायुती सरकारने दोन वर्षांपूर्वी निवडणुकीपूर्वी अशीच भरभरून आश्वासने दिली होती. त्याची पूर्तता करताना आता सरकारच्या तोंडास फेस येऊ लागला असून या सुलतानी संकटास अस्मानी दुष्काळाची जोड मिळाल्याने हे संकट अत्यंत गंभीर होऊ लागले आहे. सप्टेंबर अजून पुरता सरलाही नाही तर आसमंत 'दुष्काळदाहा'त होरपळून निघू लागला असून पुढील वर्षीच्या मृगापर्यंतचा काळ कसा रेटायचा हा प्रश्न ज्याच्या त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागला आहे. संकटे सांगून येत नाहीत. पण तरीही त्यास तोंड देण्यासाठी तयार असावे लागते. ही तयारी 'लाडक्या बहिणीं'च्या ओटीत गेली. परिणामी या लाडक्या बहिणींच्या भावाच्या/नवऱ्याच्या वा वडिलांच्या करपून गेलेल्या शेताचे नुकसान कसे भरून काढायचे असा प्रश्न राज्य सरकारला भेडसावत असल्यास आश्चर्य नाही.

आपल्याकडील शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून. चांगला पाऊस झाला; पण सिंचनसोयी नसतील तर ते पाणी वाहून जाते. त्या सोयी निर्माण करण्यासाठी सिंचनावर हजारो कोटी खर्च केले खरे. पण पाणी कुठे मुरले हे राज्यकर्त्यांनाच ठाऊक. कारण सिंचनाचा तेवढा फायदा होताना दिसत नाही. त्यात यंदा राज्यात सरासरीपेक्षा १८ टक्के पाऊस कमी झाला. मराठवाड्यात तर काही जिल्ह्यांमध्ये संपूर्ण ऑगस्ट कोरडाठाक गेला. सबब ३० सप्टेंबरपूर्वीच राज्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर करावी लागली. चारा, पिण्याचे पाणी तसेच अन्य दुष्काळी कामांवर पैसे कमी पडू दिले जाणार नाहीत तसेच शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. ते योग्यच. पण त्याचा अर्थ आता राज्य सरकारला दुष्काळी परिस्थितीशी सामना करण्याकरिता मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागणार आहे. आर्थिक आघाडीवर आधीच राज्याची बोंब. अर्थसंकल्प सादर करतानाच ४०,५५२ कोटींची महसुली तूट तर दीड लाख कोटींची राजकोषीय तूट अपेक्षित धरण्यात आली होती. त्यातच नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत फडणवीस यांनी ९७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. पुरवणी मागण्यांचे एवढे मोठे आकारमान म्हणजे राज्याचे वित्तीय नियोजन कोलमडल्याचीच एक प्रकारे कबुली. आधीच आपल्याकडे 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना', शेतकर्यांना 'साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज' अशा लोकप्रिय योजना असताना आता शेतकर्यांच्या कर्जमाफीची भर पडली. या सगळ्यामुळे राज्यावरील कजार्चा बोजा ११ लाख कोटींवर गेला. पण म्हणून दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी हात आखडता घेणे




शक्य नाही. अशा वेळी पर्याय म्हणजे आणखी कर्ज काढणे. त्याची तयारी सरकारने सुरू केली आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात कर्जावरील व्याज फेडण्याकरिता ७० हजार कोटींचा विक्रमी खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. नव्या कर्जाचा व्याज भार वेगळा.

दुष्काळी परिस्थितीमुळे खर्चात वाढ होणार असल्याने योजनांवरील तरतुदींमध्ये कपात करावी लागेल, असे मुख्यमंत्र्यांनी सूचित केले. आधीच आपला अर्थसंकल्प तुटीचा. त्यात ही दुष्काळी परिस्थिती. त्यामुळे सारेच नियोजन कोलमडणार हे ओघाने आलेच. खरे तर अशा वेळी लोकप्रिय घोषणांची अंमलबजावणी काही काळ स्थगित करता येऊ शकते. नव्हे ती करायलाच हवी. पण लाडकी बहीण योजनेचे अनुदान थांबवल्यास साऱ्या बहिणींचा संताप होण्याची भीती सरकारला तसे करू देणार नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफीची रक्कम फेडणे वा मोफत वीज राखणे कठीण. त्यात काही खोडा आल्यास शेतकरी वर्ग विरोधात जाण्याची भीती. एकूणच महायुती सरकारला आता तारेवरची कसरत करावी लागणार आहे. खरीप हंगाम हातचा गेला. त्यापाठोपाठ रब्बी हंगामातही पिकांवर परिणाम होण्याचा इशारा केंद्रीय कृषी विभागाने दिला आहे. खरीप आणि रब्बी दोन्ही हंगामांवर परिणाम झाल्यास शेतकरी अक्षरक्षः रडवेला होईल. मुख्यमंत्र्यांनीही १९७२ प्रमाणेच दुष्काळी परिस्थिती गंभीर असल्याचे म्हटले आहे.

सरकारचा कर्ज काढून केला जाणारा दौलतजादा इतक्यावरच मर्यादित राहत नाही. प्रत्येक अर्थसंकल्पात विविध स्मारके, देवस्थाने, किल्ल्यांचे संवर्धन यांच्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात येते. यंदाचे वर्ष अपवाद नाही. तसेही महायुतीचे सरकार आल्यापासून देवस्थाने, स्मारके यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. हे एक वेळ एरवी ठीक. पण प्रपंच चालवण्यास आवश्यक पैसा नसताना परमार्थाच्या वल्गना करायच्या कशाला, याचा विवेक सध्या कोणालाच नाही. त्याची आठवण करून देणे म्हणजे धर्म-देशद्रोहाचा आळ ओढवून घेणे. सरकारी अभयावर पोसले गेलेले समाजमाध्यमी टोळ आता सत्ताधीशांच्याही हाताबाहेर गेले आहेत. त्यामुळे आर्थिक परिस्थिती वाईट असल्याने धार्मिक स्थळे, स्मारके यांवरील अनावश्यक खर्च टाळण्याची हिंमत सरकार दाखवणार नाही. पुढील वर्षी होणाऱ्या नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्यावरही काही हजार कोटी खर्च केले जाणार आहेत. हा कुंभमेळा म्हणजे दुष्काळात तेरावाच म्हणायचा. त्यात साधू, महंतांचे चोचले पुरवणे सरकारने थांबवावे. कारण या मंडळींचे कितीही केले तरी समाधान होत नाही आणि त्याचा काही उपयोगही होत नाही. या मंडळींवर पैसे उधळण्यापेक्षा शेतकर्यांवरील खर्चाची तरतूद वाढवावी.

दुष्काळी परिस्थिती जाहीर करताना सरकारने २६५ तालुक्यांची यादी नुकतीच जाहीर केली. त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. काही मंत्र्यांचेच तालुके वगळण्यात आल्याची तक्रार येऊ लागली. यावर पुढील टप्प्यात आणखी तालुक्यांचा समावेश करण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. आता तर सरसकट सगळ्यांनाच मदत करण्याचे वायदे केले जात आहेत. आधीच सरसकट सर्वत्र दुष्काळ जाहीर केला असता तर ही वेळ आली नसती. आता तरी राजकारण बाजूला ठेवून हा सत्ताधार्यांचा तालुका, तो विरोधकांचा तालुका हे न बघता अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत मिळेल हे सरकारने पाहावे. दुष्काळी परिस्थिती ही राजकारणी, नोकरशहा आणि ठेकेदारांना एक प्रकारे पर्वणी ठरते. कारण खर्चावर कोणाचे नियंत्रण राहत नाही आणि हाती जामदारखान्याच्या चाव्या दिल्या जातात. अशा वेळी मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला चाप लावणे आवश्यक आहे. तसेच सत्ताधारी आमदार किंवा पक्षाच्या नेत्यांचे उगाचच लाड करू नयेत. शेवटी कठोर भूमिका घेतच दुष्काळी परिस्थिती हाताळावी लागणार आहे.

प्रत्येक निवडणुकीत भाजप किंवा मित्रपक्षांकडून 'डबल इंजिन'मुळे राज्याचा कसा फायदा होईल, असे चित्र रंगवले जाते. राज्य संकटात असताना केंद्राकडून अधिकची मदत मिळणे खरे तर अपेक्षित आहे. केंद्राकडून जास्तीत जास्त मदत मिळवण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांची कसोटी लागणार आहे. डबल इंजिनच्या काळातील हा पहिला मोठा दुष्काळ. त्याचे मूल्यमापन अधिक कठोरपणे केले जाईल.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासकीय जमिनीवर चारा पिकांची लागवड करा : खा. धैर्यशील मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याच्या अनेक भागांमध्ये अपुरा व खंडित पाऊस झाल्याने, शेती व पशुधनावर गंभीर परिणाम होत असून, सद्यस्थितीचा विचार करता आगामी काळात चारा व पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांसाठी पशुधन हा त्यांच्या उपजीविकेचा महत्त्वाचा आधार असल्याने, दुष्काळाच्या परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी शासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

शेती महामंडळ, वन विभाग तसेच शासनाच्या ताब्यात असणाऱ्या विविध जमिनी उपलब्ध असून, राज्यातील मोठ्या देवस्थानांकडे असणाऱ्या जमिनीचा योग्य वापर करून चारा पिकांची लागवड केल्यास पशुपालकांना मोठा दिलासा मिळू शकतो. त्यामुळे उपलब्ध शासकीय तसेच निमशासकीय आणि देवस्थानांच्या जमिनीची पाहणी करून योग्य जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्याची कार्यवाही तातडीने हाती घेण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

तसेच, दुष्काळाच्या कालावधीत शेळी, मेंढी, गाय, म्हैस व इतर पशुधनासाठी शासनाच्या ताब्यातील योग्य व उपलब्ध जमिनीवर नियंत्रित पद्धतीने चारा चरण्यासाठी परवानगी देण्यात यावी. यामुळे पशुपालकांना त्यांच्या पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्ध होऊन पशुधनाचे संरक्षण करण्यास मदत होईल.शासनाकडे उपलब्ध असलेल्या अधिकृत पशुधन गणनेच्या आकडेवारीनुसार प्रत्येक गावनिहाय/तालुकानिहाय पशुधनाची संख्या निश्चित करून, प्रति जनावर आवश्यक असलेला चारा व पाण्यासाठी पशुपालकांना थेट आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात यावे. सदर आर्थिक सहाय्य पात्र पशुपालक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने जमा करण्यात यावे.



तसेच, दुष्काळाच्या परिस्थितीत दूध उत्पादक शेतकरी व पशुपालकांना आर्थिक स्थैर्य मिळावे आणि पशुधनाची विक्री करण्याची वेळ त्यांच्यावर येऊ नये, यासाठी दूध उत्पादकांना प्रतिलिटर दूध उत्पादनावर विशेष अनुदान देण्याबाबतही शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा. यापूर्वी ज्या पद्धतीने दूध उत्पादकांना प्रतिलिटर रु. ५/- अनुदान देण्यात आले होते, त्याच धर्तीवर सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पात्र दूध उत्पादकांना प्रतिलिटर रु. ५/- अनुदानाची योजना तातडीने लागू करण्यात यावी. सदर अनुदानाची रक्कम पात्र दूध उत्पादकांच्या बँक खात्यावर DBT पद्धतीने जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या हातातील पशुधन टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. चारा व पाण्याअभावी पशुधनाची विक्री करण्याची वेळ पशुपालकांवर येऊ नये, तसेच दूध उत्पादन घट होऊन त्यांच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी शासनाने तातडीने व प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

तरी, संपूर्ण राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शासनाच्या ताब्यातील उपलब्ध जमिनीचा चारा उत्पादनासाठी वापर, पशुधनासाठी नियंत्रित चराईची सुविधा उपलब्ध करून देणे, पशुधनाच्या संख्येनुसार चारा व पाण्यासाठी थेट आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे आणि पूर्वीप्रमाणे पात्र दूध उत्पादकांना प्रतिलिटर रु. ५/- दूध अनुदान देणे, याबाबत तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित विभागांना द्यावेत, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केली आहे.

## ‘हे गाव माझं, मी विकू देणार नाही’- जिल्हाधिकारी

### तुळशी गावातील 'गाव विक्री'चा फलक हटवला

**माढा (कटूसत्य वृत्त):-** भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणीटंचाईला कंटाळून सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील तुळशी गावातील ग्रामस्थांनी थेट आपले 'गावच विक्रीला' काढल्याचा फलक लावून प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले होते.

या आंदोलनाची गंभीर दखल घेत सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्वतः तुळशी गावाला भेट दिली. ग्रामस्थांशी सविस्तर संवाद साधत "हे गाव माज्या जिल्ह्यातील आहे, मी हे गाव कोणत्याही परिस्थितीत विकू देणार नाही," असा विश्वास दिल्यानंतर ग्रामस्थांनी तो वादग्रस्त फलक हटवला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून तुळशी गावात पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा भीषण प्रश्न भेडसावत आहे. वारंवार निवेदने देऊनही पाणीटंचाईचा प्रश्न सुटत नसल्याने संतप्त ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीसमोर "हे गाव विक्रीला काढणे आहे" असा फलक लावला होता. या अनोख्या आंदोलनाची राज्यभरात मोठी चर्चा झाली आणि प्रशासकीय यंत्रणा खडबडून जागी झाली.




**स्वतः पाठपुरावा करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन**

या घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी तातडीने तुळशी गावात धाव घेतली. त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर ग्रामस्थांची बैठक घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. "गावाला पाणी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंत्रालयात प्रलंबित आहे. मी स्वतः या प्रस्तावाचा मंत्रालयात जाऊन तातडीने पाठपुरावा करेन आणि तुळशी गावाला कायमस्वरूपी पाणी मिळवून देईन," असा शब्द जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना दिला.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत फलक काढला**

जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या ठोस आश्वासनानंतर ग्रामस्थांनी सकारात्मक भूमिका घेतली. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच ग्रामपंचायतीसमोरील तो फलक सन्मानाने हटवण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी गावातील कोरड्या पडलेल्या विहिरी, शेती आणि पिकांची पाहणी करून नुकसानीचा आढावा घेतला.

## ‘एनडीडीबी’च्या मदतीने दूध संघ नफ्यात आणण्याचा प्रयत्न- चेअरमन रणजीतसिंह शिंदे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाच्या (एनडीडीबी) मदतीने तोट्यात असलेल्या सोलापूर जिल्हा दूध संघाला नफ्यात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशी माहिती संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

संघाची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवारी घेण्यात आली. तत्पूर्वी आयोजित पत्रकार परिषदेत चेअरमन रणजीतसिंह शिंदे यांनी संघाचा लेखाजोखा सादर केला. ते म्हणाले की, विद्यमान संचालक मंडळ अस्तित्वात येऊन ५ वर्षांचा कालावधी झाला आहे. या संचालक मंडळाच्या कालावधीतील ही ४ थी वार्षिक सर्वसाधारण सभा आहे. गत अनेक वर्षांपासून तोट्यात असलेल्या दूध संघाला फायद्यात आणण्याचा प्रयत्न संचालकांकडून करण्यात आला आहे.

पशुखाद्य कारखाना भाडेतत्त्वावर देऊन संघास प्रतिमहिना ८ लाख ५० रुपये हजार उत्पन्न सुरू केले. यापूर्वी हा कारखाना प्रतिमहिना कर्मचारी पगार, लाईट बिल, मशिनरी मेंटेनन्स व इतर खर्चाचा विचार करता प्रतिमहिना २० लाख रुपये लाईट बिल, कर्मचारी पगार १० लाख रुपये व मेंटेनन्स व इतर खर्च ५ लाख रुपये असे एकूण ३५ लाख रुपये तोट्यात होता.

पूर्वी संघाचे संकलन दैनंदिन १७ हजार लिटर होते. संचालक मंडळाच्या २०२३-२४ या कालावधीत दैनंदिन संकलन १ लाख २५ हजार लिटरपर्यंत होते. परंतु जुन्या मशिनरी व जादा कर्मचारी, दुरुस्ती खर्च जादा यामुळे प्रतिलिटर तोट्यात वाढ झाल्याने माहे ऑगस्ट २०२४ पासून संकलन बंद केल्याने प्रतिमहिना रु. २० लाख कर्मचारी खर्च अधिक लाईट बिल २० लाख रुपये प्रतिमहिना बचत झालेली आहे. त्यामुळे २०२४-२५ व २०२५-२६ या सालात संघाचा संचित तोटा रु. १० कोटीने कमी झालेला आहे.

सन २०२३-२४ ला संघाकडे बँकांची कर्जे ४२ कोटी १७ लाख रुपये इतकी होती. ती २०२५-२६ अखेर १ कोटी ४२ लाख रुपये इतकी आहेत. विद्यमान संचालक मंडळाने ३२ कोटी ७५ लाख इतक्या रकमेची बँक कर्जे परतफेड केलेली आहेत.

(पान 2 वर..)







## मतदार यादी पुनरीक्षणासाठी 3, ४, १० व ११ ऑक्टोबर रोजी विशेष शिबिरे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या अनुषंगाने २४९-सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र नागरिकांची, विशेषतः नवमतदार, महिला व दिव्यांग नागरिकांची शंभर टक्के नोंदणी सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. १, सदाशिव पडदुणे यांनी नागरिकांना या शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर दि. ३, ४, १० व ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपस्थित राहून नागरिकांकडून मतदार नोंदणी, मतदार यादीतील माहितीमध्ये दुरुस्ती तसेच नावे वगळण्यासाठी आवश्यक अर्ज स्वीकारणार आहेत.

नव्याने मतदार नोंदणी करण्यासाठी दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांना नमुना क्र. ६ मध्ये अर्ज करता येईल. मतदार यादीतील चुकीची नोंद तसेच मयत किंवा स्थलांतरित मतदाराचे नाव वगळण्यासाठी नमुना क्र. ७ मध्ये अर्ज करता येईल. तसेच नाव, वय, लिंग, नातेसंबंध, पत्ता आदी तपशीलांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी नमुना क्र. ८ मध्ये अर्ज करता येईल.

या विशेष शिबिरांमध्ये संबंधित राजकीय पक्षांचे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधीही उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी आपल्या मतदान केंद्रावर उपस्थित राहून मतदार यादीतील नोंदी तपासाव्यात व आवश्यकतेनुसार नोंदणी, दुरुस्ती अथवा नाव वगळण्याची कार्यवाही करून घ्यावी.

विशेष शिबिरांमध्ये महिला व दिव्यांग नागरिकांच्या समावेशनाला विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. पात्र नागरिक मतदार यादीत नोंदणीपासून वंचित राहू नयेत, तसेच मतदार यादीतील नोंदी अद्ययावत राहाव्यात, यासाठी नागरिकांनी या विशेष शिबिरांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीत आपले नाव नोंदवावे आणि मतदार यादीतील आपली नोंद अद्ययावत असल्याची खात्री करावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. १ यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.



## संपादकीय

# उत्सवाचा जल्लोष की नागरिकांचा कोंडमारा?

उच्च न्यायालयाने घेतलेली कडक भूमिका आणि जनमताचा रेटा यांमुळे 'डीजे'च्या कंठाळी उन्मादावर आलेली मर्यादा; मात्र दुसरीकडे ढोल-ताशांचा वाढता दणदणाट आणि संथपणाचा कहर, असा यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीचा संमिश्र लेखाजोखा आहे. लाखोंच्या संख्येने नागरिक रस्त्यांवर आल्यानंतरही किरकोळ प्रकार वगळता राज्यभरातील विसर्जन मिरवणुका शांततेत पार पडल्या, याचे श्रेय गर्दीचे व्यवस्थापन करणाऱ्या पोलिसांना आणि शांतताप्रिय जनतेला द्यावे लागेल. मात्र, पुण्यातील विसर्जन मिरवणुकीने यंदा रेंगाळण्याचा ३५ तासांचा विक्रम गाठला, त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न अस्थानी ठरणार नाही. वाढत चाललेली गर्दी, प्रत्येक चौकात वादन करण्याचा अट्टहास, पोलिसांनी फक्त कायदा-सुव्यवस्थेवर केंद्रित केलेले लक्ष आणि पुढाऱ्यांकडून होणारा कार्यकर्त्यांचा अनुनय यांमुळे मिरवणुकांचे नियोजन कागदावरच राहिले.

गणेशोत्सवच नव्हे, तर वर्षभर साजऱ्या होणाऱ्या सार्वजनिक सण-उत्सवांमध्ये ध्वनिवर्धकांचा आवाज टिपेला पोहोचला आहे; त्यामुळे हैराण झालेल्या नागरिकांनी यंदा आवाज उठवल्याने गणेशोत्सवामध्ये हाच चर्चेचा प्रमुख विषय ठरला. सहसा रस्त्यावर न उतरणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांनी यंदा मोर्चे काढून निषेध केला. मुंबई उच्च न्यायालयानेही या कानठळ्यांबाबत कडक भूमिका घेतली आणि कायद्याचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी यंत्रणांना स्पष्ट आदेश दिले होते. त्यामुळे पोलिसांनी 'डीजे'च्या वापराबाबत नियमावली घालून दिली होती. त्याचे काही अंशी सकारात्मक परिणाम दिसून आले आणि मुख्य मिरवणुकांमध्ये 'डीजे'चे आवाज बव्हंशी मर्यादेत राहिले. मात्र, अनेक मंडळे एकत्र येतात, अशा ठिकाणी किंवा उपनगरांमध्ये त्यांच्या आवाजाने १०५ डेसिबलची अतिधोकादायक पातळी गाठली. एकीकडे 'डीजे'ला वेसण घालताना 'पारंपरिक वाद्ये'च्या नावाखाली ढोल-ताशा पथकांनी मात्र ठिकठिकाणी नियम टोलवले. त्यांच्या वादनाने आवाजमर्यादा पार केलीच; त्याबरोबरच पथकामध्ये वादकांची अमर्याद संख्या आणि प्रत्येक चौकात थांबून 'स्थिर वादन' करण्याचा अट्टहास यांमुळे पुण्यातील मिरवणूक लांबली. गेल्या काही वर्षांत पुण्यात दोन मिरवणुका सुरू झाल्या आहेत. अनंत चतुर्दशीच्या दिवशी मानाचे पाच गणपती व अन्य प्रमुख मंडळांचीच मिरवणूक पार पडते; इतर शेकडो मंडळे मुख्य रस्त्यावर येण्याची वाट पाहत राहतात आणि दुसऱ्या दिवशी सकाळपासून त्यांची स्वतंत्र मिरवणूक सुरू होते. काही मंडळे रात्री बारा वाजता ध्वनिवर्धक बंद झाल्यावर जागीच थांबतात आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा मिरवणूक सुरू करतात, त्यामुळे वेळ वाढतो. या मिरवणुका लवकर पूर्ण करण्याची जबाबदारी घेण्यास कोणीही तयार नाही. यंदा मेट्रोमुळे पुण्यात अनंत चतुर्दशीच्या दिवशी अतिरिक्त लाखो लाख नागरिकांची गर्दी वाढली होती. पोलिसांनी संपूर्ण लक्ष गर्दीचे व्यवस्थापन आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यावरच केंद्रित केले आणि वेळेत पुढे जाण्याची जबाबदारी पूर्णपणे कार्यकर्त्यांवर सोडून दिली. गणेशोत्सवापूर्वी बैठका घेऊन करण्यात आलेले नियोजन कागदावरच राहिले. पुण्याच्या कारभाऱ्यांनी तर फक्त कार्यकर्त्यांच्या कलाने घेण्याचे जणू ठरवले असावे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना होणारे त्रास त्यांच्या गावीही नव्हते.

कोल्हापूर, नाशिक व नागपूरसारख्या ठिकाणीही यंदा लोकजागृतीमुळे 'डीजे'च्या आवाजावर मर्यादा आल्या, ही सकारात्मक बाब म्हणावी लागेल. मात्र, यंदा सर्वच शहरांमधील गर्दी वाढल्याचे दिसले. या नागरिकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्याकडे मात्र सर्व यंत्रणांचे दुर्लक्ष होते, हे पुन्हा आढळले. एकीकडे अनेक शहरांमध्ये प्रबोधनात्मक कार्यक्रम, जनजागृतीपर देखाव्यांची संख्या वाढली आहे. नैसर्गिक जलप्रवाह प्रदूषित होऊ नयेत, म्हणून महापालिकांनी ठेवलेल्या कृत्रिम हौदांमध्ये लाखो गणेशमूर्तींचे विसर्जन झाले, गुलालाचा वापरही तुलनेने कमी झाला. मात्र, गणेशोत्सव मंडळांची संख्या वाढत असून सर्वांचाच मुख्य मार्गावरूनच मिरवणूक काढण्याच्या आग्रहामुळे ती रेंगाळते. या मिरवणुकीस विकेंद्रित स्वरूप देण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. कोल्हापूरसारख्या शहरांमध्ये मिरवणुका वेळेत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण होते; तोच धडा अन्य शहरांनी घेण्यास काय प्रत्यवाय आहे? उत्सव हा नागरिकांना एकत्र आणण्यासाठी असतो, कोणालाही वेठीस धरण्याचा उद्देश त्यामागे नसावा, याचे भान सर्वांना आल्यावरच उत्सवाचा आनंद द्विगुणित होईल.

# वृद्धत्व : आधाराची नव्हे, सन्मानाची गरज

दरवर्षी १ ऑक्टोबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन' म्हणून साजरा केला जातो. वृद्ध व्यक्तींचे हक्क, आरोग्य, सुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक सहभाग आणि सन्मानपूर्वक जगण्याचा अधिकार याविषयी जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १४ डिसेंबर १९९० रोजी १ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन म्हणून घोषित केला. वाढते आयुर्मान आणि वृद्ध लोकसंख्येचे वाढते प्रमाण यामुळे वृद्धत्वाचा प्रश्न आता केवळ कुटुंबापुरता मर्यादित राहिलेला नाही; तो आरोग्य, सामाजिक सुरक्षा, अर्थव्यवस्था, निवास, मानवी हक्क आणि सार्वजनिक धोरणांशी जोडलेला व्यापक सामाजिक प्रश्न बनला आहे. त्यामुळे या दिनाचे महत्त्व वृद्ध व्यक्तींना शुभेच्छा देण्यापुरते मर्यादित न ठेवता वृद्धत्वाकडे पाहण्याच्या सामाजिक दृष्टिकोनाचा पुनर्विचार करण्याचे आहे.

वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे; तो आजार किंवा व्यक्तीच्या उपयुक्ततेचा अंत नाही. वयानुसार शारीरिक क्षमतांमध्ये बदल होऊ शकतात, परंतु आयुष्यभराच्या अनुभवातून निर्माण झालेले ज्ञान, सामाजिक जाण, निर्णयक्षमता आणि जीवनदृष्टी ही वृद्ध व्यक्तींची मोठी संपत्ती असते. कुटुंबासाठी आयुष्यभर श्रम करणाऱ्या, मुलांचे संगोपन करणाऱ्या आणि विविध सामाजिक बदलांचे साक्षीदार असलेल्या वृद्धांच्या योगदानाकडे केवळ ह्याकाळजी घेण्याची गरज असलेली व्यक्ती' या चौकटीत पाहणे अन्यायकारक ठरते. रोजगारातून निवृत्ती घेतल्यानंतर व्यक्तीची सामाजिक भूमिका संपत नाही. उलट, अनुभवाच्या आधारे पुढील पिढीला मार्गदर्शन करण्याची तिची क्षमता अधिक महत्त्वाची ठरू शकते.

भारतीय समाजात संयुक्त कुटुंबपद्धतीमुळे वृद्धांना कुटुंबाच्या दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान होते. अनेक पिढ्या एकत्र राहत असल्याने आजी-आजोबांचा नातवंडांशी संवाद, घरातील निर्णयांमध्ये सहभाग आणि अनुभवांचे हस्तांतरण सहज घडत असे. मात्र, नागरिकरण, औद्योगिकीकरण, शिक्षण व रोजगारासाठी स्थलांतर आणि बदलती जीवनशैली यामुळे कुटुंबरचना बदलली आहे. लहान कुटुंबांचे प्रमाण वाढले असून तरुण पिढी शिक्षण किंवा रोजगारासाठी दूरवर स्थायिक होत आहे. त्यामुळे वृद्ध पालक आणि मुलांमध्ये भौगोलिक अंतर वाढले आहे. तंत्रज्ञानामुळे संपर्क शक्य झाला असला तरी प्रत्यक्ष सहवास, संवाद आणि भावनिक जवळीक यांची पूर्ण भरपाई तंत्रज्ञान करू शकत नाही. यामुळे वृद्धांच्या जीवनातील एकटेपणाचा प्रश्न गंभीर होत आहे. घरात माणसे असूनही आपले म्हणणे ऐकून घेणारा कोणी नाही, निर्णयांमध्ये आपले मत विचारले जात नाही किंवा आपल्या भावनांना पुरेसा प्रतिसाद मिळत नाही, अशी अवस्था मानसिक एकाकीपणाला जन्म देऊ शकते. विशेषतः जोडीदाराच्या निधनानंतर किंवा मुलांचे स्थलांतर झाल्यानंतर ही पोकळी अधिक तीव्र होते. वृद्धांची काळजी म्हणजे केवळ अन्न, औषधे आणि निवारा देणे नव्हे; त्यांना वेळ देणे, त्यांचे म्हणणे ऐकणे, त्यांच्या आवडी-निवडींचा आदर करणे आणि कुटुंबातील त्यांचे स्थान कायम ठेवणे तितकेच आवश्यक आहे. भावनिक सहवास ही वृद्धत्वातील मूलभूत गरज आहे.

आरोग्य हा वृद्धत्वातील आणखी एक केंद्रस्थानी असलेला प्रश्न आहे. वाढत्या वयाबरोबर दृष्टी व श्रवणक्षमता कमी होणे, सांधेदुखी, हाडांची झीज, हालचालींवरील मर्यादा, रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार आणि इतर दीर्घकालीन आजार उद्भवू शकतात. त्यामुळे वृद्धांसाठी आरोग्यव्यवस्था उपचारापुरती मर्यादित न ठेवता नियमित तपासणी, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, पोषण, योग्य शारीरिक हालचाल, औषधांचे व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश करणारी असावी. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्यसेवा सुलभ करणे आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञ उपचारांपर्यंत पोहोच सुनिश्चित करणे विशेष महत्त्वाचे आहे. वृद्ध व्यक्तींच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे तिच्या जीवनमानाकडे दुर्लक्ष करणे होय.

शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्याचीही काळजी आवश्यक आहे. निवृत्तीनंतरची बदललेली दिनचर्या, सामाजिक भूमिकेचे महत्त्व कमी होणे, आर्थिक चिंता, जोडीदाराचा मृत्यू, मुलांपासून वाढलेले अंतर किंवा दीर्घकालीन आजार यांमुळे मानसिक ताण निर्माण होऊ शकतो. अनेक वृद्ध आपले त्रास व्यक्त न करता 'वय झाले की असे होते' या समजुतीमुळे त्यांच्या मानसिक समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. प्रत्यक्षात संवाद, सामाजिक सहभाग, छंद, सांस्कृतिक उपक्रम आणि आवश्यकतेनुसार समुपदेशन यांमुळे वृद्धांच्या मानसिक स्वास्थ्याला आधार मिळू शकतो. मानसिक आरोग्याला शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्व देणे ही काळाची गरज आहे.

वृद्धत्वातील आर्थिक सुरक्षितता हा स्वाभिमानाशी संबंधित प्रश्न आहे. संघटित क्षेत्रातील निवृत्तीवेतनधारकांना नियमित उत्पन्नाचा आधार असू शकतो; परंतु असंघटित क्षेत्रात आयुष्यभर काम केलेल्या शेतमजूर, लहान शेतकरी, घरगुती कामगार, बांधकाम कामगार आणि छोट्या व्यवसायांवर अवलंबून असलेल्या व्यक्तींसाठी वृद्धापकाळातील आर्थिक स्थैर्य अधिक कठीण असते. बचतीचा अभाव, नियमित उत्पन्न नसणे आणि आरोग्यखचार्चा वाढता भार यामुळे असुरक्षितता वाढू शकते. त्यामुळे सामाजिक सुरक्षा, निवृत्तीवेतन, आरोग्य संरक्षण आणि इतर कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र वृद्धांपर्यंत सहज व वेळेवर पोहोचणे आवश्यक आहे. वृद्धांची आर्थिक सुरक्षितता ही दया नसून सामाजिक न्यायाचा विषय आहे.

वृद्ध व्यक्तींवरील अत्याचार हा समाजासमोरील गंभीर प्रश्न आहे. शारीरिक हिंसेबरोबर मानसिक छळ, अपमान, दुर्लक्ष, आर्थिक शोषण, मालमत्तेवर दबाव आणणे किंवा औषधोपचार व मूलभूत गरजा नाकारणे अशा विविध स्वरूपांत अत्याचार होऊ शकतात. कुटुंबातील व्यक्तींवर अवलंबून राहण्याची परिस्थिती असल्याने अनेक वृद्ध तक्रार करण्यास घाबरतात. त्यामुळे कायदेशीर संरक्षणाबरोबरच तक्रार नोंदविण्याची सुलभ व्यवस्था, सामाजिक जागरूकता आणि गरजूंना तातडीची मदत उपलब्ध होणे आवश्यक आहे. वृद्धांच्या सन्मानाचे रक्षण करणे हे त्यांच्या मूलभूत मानवी अधिकारांचे संरक्षण करण्याशी जोडलेले आहे.

वृद्ध महिलांच्या प्रश्नांकडेही स्वतंत्रपणे पाहणे गरजेचे आहे. आयुष्यभर घर आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळलेल्या अनेक महिलांकडे स्वतंत्र आर्थिक साधने मर्यादित असतात. पतीच्या निधनानंतर त्यांची आर्थिक व सामाजिक असुरक्षितता वाढू शकते. विशेषतः ग्रामीण भागात आरोग्यसेवा, वाहतूक, बँकिंग आणि शासकीय योजनांपर्यंत पोहोचताना त्यांना अतिरिक्त अडचणी येऊ शकतात. त्यामुळे वृद्ध महिलांना आर्थिक स्वावलंबन, सुरक्षितता, आरोग्यसेवा आणि निर्णयप्रक्रियेत सहभागाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

ग्रामीण आणि शहरी वृद्धांचे प्रश्नही त्यांच्या परिस्थितीनुसार बदलतात. ग्रामीण भागात सामाजिक संबंध आणि शेजारधमार्चा आधार असला तरी आरोग्यसेवा, वाहतूक व आर्थिक सुविधा मर्यादित असू शकतात. शहरांमध्ये विविध सुविधा उपलब्ध असूनही वेगवान जीवनशैली, महागडे जीवनमान आणि सामाजिक तुटकपणा यांमुळे एकटेपणाची समस्या वाढू शकते. म्हणून वृद्धांसाठी एकच उपाय सर्वत्र लागू करण्याऐवजी स्थानिक गरजांनुसार सेवा विकसित करणे आवश्यक आहे. वृद्धस्नेही सार्वजनिक व्यवस्था उभारण्यासाठी सुरक्षित पदपथ, बसण्याची ठिकाणे, सुलभ वाहतूक, सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि सहज उपलब्ध आरोग्यसेवा यांचा विचार केला पाहिजे.

डिजिटल युगात वृद्धांसाठी तंत्रज्ञान हे संधीचे साधनही आहे आणि आव्हानही. मोबाईल व संगणकाच्या माध्यमातून बँकिंग, शासकीय सेवा, आरोग्यविषयक माहिती आणि दूरस्थ संवाद सहज शक्य झाला आहे. मात्र डिजिटल साधनांचा पुरेसा परिचय नसल्यामुळे काही वृद्ध या सुविधांपासून दूर राहतात. त्याचवेळी बनावट दूरध्वनी, संदेश, फसवे दुवे आणि आर्थिक आमिषांद्वारे डिजिटल फसवणुकीचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वृद्धांना डिजिटल साक्षर करण्याबरोबरच सुरक्षित व्यवहार, गोपनीय माहितीचे संरक्षण आणि संशयास्पद संदेशांची पडताळणी यांचेही प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. कुटुंबातील तरुणांनी वृद्धांना तंत्रज्ञानापासून दूर ठेवण्याऐवजी त्याचा सुरक्षित वापर शिकविणे ही पिढ्यांमधील सहकार्याची नवी दिशा ठरू शकते.

वृद्ध व्यक्ती समाजाच्या सामूहिक स्मृतीच्या महत्त्वाच्या वाहक आहेत. स्थानिक इतिहास, पारंपरिक शेती, लोककला, बोलीभाषा, लोकपरंपरा, सामाजिक बदल आणि जीवनसंघर्ष यांचे अनुभव त्यांच्या स्मरणात जतन झालेले असतात. आधुनिकतेच्या वेगात या अनुभवांचे दस्तऐवजीकरण न झाल्यास मौल्यवान सामाजिक ज्ञान नष्ट होऊ शकते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना वृद्धांशी संवाद साधण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्यास पिढ्यांमधील दरी कमी होईल आणि मौखिक इतिहासाचे जतनही करता येईल. वृद्धांच्या अनुभवाकडे भूतकाळातील आठवणी म्हणून नव्हे, तर वर्तमानाला दिशा देणाऱ्या सामाजिक संपत्ती म्हणून पाहण्याची गरज आहे.

वृद्धत्व म्हणजे निष्क्रियता असा समजही बदलला पाहिजे. आपल्या क्षमता आणि इच्छेनुसार वृद्धांना सामाजिक उपक्रम, वाचन, लेखन, कला, संगीत, बागकाम, मार्गदर्शन, सामाजिक सेवा किंवा अनुभवाधारित कार्यात सहभागी होता येते. काही वृद्धांना निवृत्तीनंतरही काम करण्याची इच्छा असते; त्यांच्या आरोग्याचा आणि क्षमतेचा विचार करून सन्मानजनक संधी उपलब्ध करून देता येतात. यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि समाजालाही त्यांच्या अनुभवाचा लाभ मिळतो. वृद्धांना केवळ मदतीचे लाभार्थी न मानता सामाजिक सहभागाचे अधिकार असलेले नागरिक म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे.

वृद्धांच्या प्रश्नांवर शासन आणि कुटुंबाबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्यव्यवस्था, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनीही काम करणे गरजेचे आहे. सामाजिक सुरक्षा योजनांचा प्रभावी लाभ, आरोग्यसेवा, सुरक्षित निवास, सार्वजनिक सुविधांची सुलभता, समुपदेशन आणि सामाजिक संवादाची साधने उपलब्ध झाली तर वृद्धांचे जीवन अधिक सुरक्षित होऊ शकते. मात्र धोरणे आणि योजना कितीही चांगल्या असल्या तरी त्यांची परिणामकारकता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून असते. वृद्ध व्यक्तीला कार्यालये, रुग्णालये किंवा शासकीय यंत्रणांमध्ये सन्मानाने वागणूक मिळणे हीदेखील कल्याणाचीच बाब आहे.

या सर्व प्रक्रियेत कुटुंबाची भूमिका सर्वाधिक जवळची आणि प्रभावी आहे. वृद्ध आई-वडिलांना आर्थिक मदत करणे पुरेसे नाही; त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करणे, आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना कौटुंबिक जीवनात सहभागी करून घेणे आवश्यक आहे. वृद्ध व्यक्तीला 'तुमचे वय झाले' असे वारंवार जाणवून देण्यापेक्षा ह्यतुमचा अनुभव आमच्यासाठी महत्त्वाचा आहे' ही भावना देणे अधिक मोलाचे आहे. पिढ्यांमधील संवाद वाढला तर वृद्धांच्या मानसिक गरजा पूर्ण होण्याबरोबरच तरुण पिढीलाही जीवनातील अनुभव आणि मूल्यांची समृद्ध जाण मिळू शकते.

आज वृद्धत्वाचा प्रश्न लोकसंख्येतील बदलाशीही जोडला गेला आहे. आयुर्मान वाढत असताना वृद्ध व्यक्तींची संख्या वाढत आहे. त्यामुळे भविष्यातील समाजरचनेत आरोग्य, सामाजिक सुरक्षा, निवास, दीर्घकालीन काळजी, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सहभाग यांचे नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे. अधिक वर्षे जगणे ही मानवी प्रगतीची उपलब्धी आहे; परंतु त्या वर्षांना आरोग्य, स्वायत्तता, सुरक्षितता आणि प्रतिष्ठेची जोड मिळाली तरच दीर्घायुष्य अर्थपूर्ण ठरते. वृद्ध लोकसंख्या ही केवळ आव्हान नसून अनुभव, कौशल्य आणि सामाजिक स्मृतीचा मोठा स्रोतही आहे.

१ ऑक्टोबरचा आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन म्हणूनच एका दिवसाच्या औपचारिक कार्यक्रमापुरता मर्यादित राहू नये. आपल्या घरातील वृद्ध व्यक्तीशी आपण किती संवाद साधतो, तिचे मत किती ऐकतो, तिच्या आरोग्याची किती काळजी घेतो आणि तिच्या अनुभवाला किती स्थान देतो, याचा विचार या निमित्ताने झाला पाहिजे. वृद्धांना दयेची नव्हे, तर सन्मानाची गरज आहे; केवळ संरक्षणाची नव्हे, तर स्वायत्ततेची गरज आहे; केवळ सहानुभूतीची नव्हे, तर सामाजिक सहभागाची संधी आवश्यक आहे. वृद्धत्वाकडे ओझे म्हणून पाहणारी मानसिकता बदलून अनुभवसंपन्न जीवनाचा परिपक्व टप्पा म्हणून त्याचा स्वीकार करणे ही अधिक संवेदनशील समाजाची खूण आहे. वास्तविक पाहता वृद्ध व्यक्तींचा सन्मान हा एका पिढीपुरता प्रश्न नाही. ज्यांनी कुटुंब आणि समाजाच्या उभारणीत आयुष्य घालविले, त्यांच्या जीवनाच्या उत्तरार्धात सुरक्षितता, आपलेपणा आणि प्रतिष्ठा मिळणे ही सामूहिक जबाबदारी आहे. वृद्धत्वाला दुर्बलतेशी जोडण्याऐवजी अनुभव, ज्ञान आणि सामाजिक योगदानाशी जोडले पाहिजे. कारण वृद्ध व्यक्तींच्या आयुष्यात केवळ गेलेल्या काळाच्या आठवणी नसतात, तर पुढील पिढ्यांना दिशा देणारे अनुभवही असतात. म्हणूनच वृद्धत्वाचा सन्मान म्हणजे अनुभवाचा सन्मान आणि अनुभवाचा सन्मान म्हणजे माणुसकीचा सन्मान होय.



-डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# माहिती अधिकार दिनानिमित्त दक्षिण सोलापूर पंचायत समितीत कार्यशाळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे माहिती अधिकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. गटविकास अधिकारी मनोज राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली माहितीच्या अधिकाराबाबत कार्यशाळा तसेच प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे यांनी माहितीच्या अधिकाराचे महत्त्व विशद केले. प्रशासनात पारदर्शकता आणणे, शासकीय कामकाज जनतेसाठी खुले करणे आणि नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास वाढविणे हा माहितीच्या अधिकार कायद्याचा प्रमुख उद्देश आहे, असे त्यांनी सांगितले.

माहिती अधिकार कायद्यानुसार अर्जदाराने मागितलेली माहिती निर्धारित मुदतीत, साधारणपणे ३० दिवसांच्या आत देणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार हा नागरिकांचा महत्त्वाचा कायदेशीर अधिकार असून, नागरिकांना माहिती देताना प्रशासनाने सहकायार्ची भूमिका ठेवणे गरजेचे आहे, असेही गोडसे यांनी नमूद केले.

कार्यालयातील कामकाजाचे स्वरूप, विविध नियम, कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती संकेतस्थळावर आणि सूचना फलकावर अद्ययावत ठेवण्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली.

कार्यशाळेनंतर माहितीच्या अधिकारावर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यामध्ये मनीषा वास्ते, गिरीषचंद्र वाघमारे, ज्योतीराम भोसले, सदाशिव कोळी, सुरेश राठोड, समीर शेख, मृणालिनी शिंदे, संदीप घोडके, शहानवाज शेख, बसवराज बिराजदार, रुपाली मोरे, स्नेहा जाधव, अंजली पाटील, आरती मैंदळकर, सुरेखा तोंडसे, मिलन बिराजदार, श्रीकांत माने, चंद्रकांत जगताप, अजीज सय्यद, महेश गायकवाड, मनोहर राठोड, दिपाली देंडे आणि प्रज्वल कुर्ले यांनी सहभाग घेतला.

# जिल्ह्यात १ ऑक्टोबर रोजी एक तास सामुहिक श्रमदान : सिईओ कुशल जैन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** "स्वच्छता ही सेवा 2026 अभियानांतर्गत 'एक दिवस, एक तास, एक साथ' या उपक्रमाचे आयोजन 1 ऑक्टोबर 2026 रोजी जिल्ह्यात व्यापक स्वरूपात करण्यात येणार असल्याची माहिती सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.

संकल्प सेवा अभियान अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात ११ तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती मध्ये श्रमदानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करणे आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी गावांच्या निर्मितीसाठी लोकसहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत सकाळी 8.00 वा ग्रामपंचायत स्तरावर सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर, रस्ते, चौक, पर्यटन ठिकाणे, मंदिरे,तीर्थक्षेत्रे व प्रार्थना स्थळे व नदी परिसर, जलस्रोत परिसर तसेच इतर आवश्यक ठिकाणी सामूहिक श्रमदान व स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यासोबतच कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, परिसर स्वच्छ ठेवणे आणि स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम न राहता ती प्रत्येक गावाची आणि प्रत्येक नागरिकाची दैनंदिन जबाबदारी झाली पाहिजे. 1



ऑक्टोबर रोजी प्रत्येकाने किमान एक तास स्वच्छतेत सहभाग दिल्यास सामूहिक सहभागातून स्वच्छ आणि निरोगी गावांची निर्मिती अधिक प्रभावीपणे करता येईल. नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश घराघरात पोहोचवावा तसेच या उपक्रमात अधिकारी-कर्मचारी, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला बचत गट, युवक, स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी केले आहे.

पान १ वरून

# 'एनडीडीबी'च्या मदतीने दूध संघ...

सन २०२३-२४ ला संघाकडे दूध उत्पादकांची देणी ५ कोटी २० लाख रुपये होती. ती २०२५-२६ अखेर निरंक आहे. विद्यमान संचालक मंडळाने दूध उत्पादकांची २०२५-२६ अखेर ५ कोटी २० लाख देणी अदा केलेली आहेत.

सन २०२४-२५ ला संघाकडे कर्मचाऱ्यांची पगार, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी इत्यादीची देणी रु. ८ कोटी १ लाख होती. ती २०२५-२६ अखेर २ कोटी ९० लाख देणी आहेत. विद्यमान संचालक मंडळाने कर्मचारी देणी ५ कोटी १८ लाख रुपये अदा केलेली आहेत.सन २०२३-२४ ला संघाची दूध संस्था व इतरांकडे रु. १९ कोटी ७१ लाख इतकी येणे बाकी होती. ती २०२५-२६ अखेर रु. १२ कोटी ५२ लाख आहेत. विद्यमान संचालक मंडळाने दूध संस्था व इतरांवर कोर्ट केसेस करून ७ कोटी १९ लाख रुपये येणे बाकी वसुली केलेली आहे.

सन २०२३-२४ साली कर्मचारी संख्या १६९ इतकी होती व पगारावरील खर्च ४ कोटी ६७ लाख रुपये वार्षिक इतका होता. सन २०२५-२६ साली कर्मचारी संख्या २९ असून पगारावरील खर्च १ कोटी ४० लाख रुपये आहे. सध्य:स्थितीत कार्यरत कर्मचारी २९ असून पगारावर खर्च वार्षिक ३६ लाख रुपये आहे. सन २०२३-२४ च्या तुलनेत संचालक मंडळाने ३ कोटी रुपये वार्षिक पगारावरील खर्च कर्मचारी कपात करून कमी केलेला आहे.

संघाचा मागील २०१७ पासूनचा सततचा तोटा कमी होऊन या वर्षी संघ नफ्यामध्ये आलेला आहे. विद्यमान संचालक मंडळ अस्तित्वात येताना संघास २०२२-२३ ला ९ कोटी ८२ लाख इतका तोटा होता. आज २०२५-२६ या सालात संघ नफ्यात आला, आहे, असे रणजीतसिंह शिंदे यांनी सांगितले.

**सध्य:स्थितीत संघ ना नफा ना तोटा आहे**

सन २०२३-२४ ला संघास वार्षिक इलेक्ट्रीक बिल १ कोटी ८४ लाख रुपये इतके होते. सन २०२५-२६ अखेर इलेक्ट्रीक बिल २ लाख ६१ हजार रुपये इतके आहे. विद्यमान संचालक मंडळाने शीतकरण केंद्र बंद करण्याचा निर्णय घेतल्याने १ कोटी ८१ लाख रुपये इतकी इलेक्ट्रीक बिल खर्चात बचत झालेली आहे.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संघास ३२ कोटी ४१ लाख रुपये इतका नफा दिसतो. हा नफा पंढरपूर व टेंभुर्णी येथील जागा विक्रीच्या व्यवहारातून झालेला आहे. हा नफा संचित तोट्यामध्ये सन २०२६-२७ ला वर्ग केला जाईल. त्यामुळे सध्य:स्थितीत संघ ना नफा ना तोटा असा आहे.

# लता मंगेशकर यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त सोहळा संपन्न

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त रविवारी पुणे कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सोहळा पार पडला. पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या वतीने या विशेष कार्यक्रमाचे



आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी पुस्तक प्रकाशन सोहळा देखील संपन्न झाला. कार्यक्रमात उपस्थितांनी लतादीदींच्या कालजयी आठवणींना उजाळा देत लतादिदी ना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. यावेळी संगीत क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकार व रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत फिजिओथेरपी व आरोग्य तपासणी शिबिर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने ह्यसेवा संकल्प अभियानह्ल तसेच जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत फिजिओथेरपी व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर शिबिरामध्ये दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, आवश्यक उपचार तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींना आरोग्याच्या समस्या, शारीरिक हालचालींशी संबंधित अडचणी तसेच फिजिओथेरपीविषयक आवश्यक मार्गदर्शन तज्ज्ञांकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

हे शिबिर दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले असून, शिबिराचे स्थळ मनपा शाळा क्रमांक ६, भौतिकोपचार केंद्र, जोड बसवण्णा चौक, सोलापूर हे आहे.

दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## वात्रटिका

### परतीची अशा

आशा अजूनही आहे
आणि अजून आहे भरोसा...
पण आलाच नाही तो तर
परतीचा बरसणार कसा...
अवखळ अवकाळी धर्म
विसरून गेला आता पाऊस...
अंदाज चुकला भल्याभल्यांचा
तरी अजूनही काहींना आहे हौस...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोलापूर पर्यटन सप्ताह निमित्त भालेवाडी येथे विविध उपक्रमांचे आयोजन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर पर्यटन सप्ताह २०२६ निमित्त एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प व जिल्हा नियोजन समिती अंतर्गत विकसित होत असलेल्या 'मिल्क अँड मिलेट व्हिलेज – भालेवाडी' येथे विविध पर्यटनविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, पर्यटन समिती सदस्य, महिला बचत गट तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ मॅडम, तालुका उपकृषी अधिकारी प्रशांत काटे साहेब, ITDP चे प्रकल्प समन्वयक रोहित आदमाने, कृषी पर्यटन तज्ञ अविनाश एखंडे, क्षेत्र समन्वयक दादासाहेब खाडे, उमेद तालुका व्यवस्थापक उमेश डांगे, उमेद प्रकल्प व्यवस्थापक लिंगराज शरणार्थी, प्रा. डॉ. राजाराम पवार व त्यांचे सर्व सहकारी तसेच श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा येथील विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

तसेच मौजे सरकोली येथील पर्यटन टीम, जि.प. प्राथमिक शाळा भालेवाडीचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद, श्रीराम भजनी मंडळ, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा वर्कर, पोलीस पाटील तसेच मंगळवेढा पंचायत समितीचे सर्व ग्रामविकास अधिकारी यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास भालेवाडीचे सरपंच डॉ. श्रीकांत दवले, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय गायकवाड, उपसरपंच उषाताई गवळी तसेच ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी गावातील तरुण वर्ग, महिला भगिनी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्पाच्या माध्यमातून भालेवाडी गावाचा 'मिल्क अँड मिलेट व्हिलेज' म्हणून पर्यटनदृष्ट्या विकास करण्यात येत असून, स्थानिक कृषी, दुग्धव्यवसाय, मिलेट्स, ग्रामीण जीवनशैली व स्थानिक संस्कृती यांचा पर्यटनाशी समन्वय साधून गावातील स्थानिक पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, निबंध, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, योग व स्वच्छता अभियानाचे आयोजन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने दि. 17 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर 2026 या कालावधीत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांच्यामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक, सामाजिक, आरोग्यविषयक तसेच जनजागृतीपर विविध कार्यक्रम घेण्यात आले.

दि. 17 सप्टेंबर रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर कार्यालयामार्फत विभागाच्या विविध योजनांची माहिती देणारा चित्ररथ तयार करून प्रकल्प कार्यालय, सोलापूर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पार्क चौक, सोलापूर आणि तेथून पुन्हा प्रकल्प कार्यालयापर्यंत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले.

तसेच आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, सोलापूर; आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, सोलापूर; आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, बार्शी; आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, धाराशिव; 50 आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, धाराशिव आणि आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, कळंब या सहा शासकीय वसतिगृहांमध्ये चित्रकला, रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा तसेच स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमध्ये वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

दि. 21 सप्टेंबर रोजी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, होटगी (ता. दक्षिण सोलापूर), शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सवतगव्हाण (ता. माळशिरस), शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, वरुडा (जि. धाराशिव), अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वैराग (ता. बार्शी) आणि अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, मोहा (ता. कळंब) तसेच संबंधित शासकीय व अनुदानित आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहांमध्ये 'आदिवासी क्रांतिकारकांचे चरित्र व शौर्यगाथा' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

दि. 22 सप्टेंबर रोजी शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत विविध जातींच्या एकूण 70 वृक्षांची लागवड विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आदिवासी मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले.

दि. 23 सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या उपक्रमात एकूण 268 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यासोबतच शाळा व वसतिगृहांच्या ठिकाणी व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली. जनकल्याणकारी योजनांची माहिती देण्यासाठी कला पथक व नाट्यपथकाच्या माध्यमातून जनजागृतीपर कार्यक्रमही घेण्यात आले.

दि. 24 सप्टेंबर रोजी शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांमध्ये सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी योग शिबिर व ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले.

दि. 25 सप्टेंबर रोजी सेवा संकल्प अभियानांतर्गत प्रकल्प कार्यालय, शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांमध्ये हुतात्मा नाग्या कातकरी जयंती साजरी करण्यात आली.

दि. 28 सप्टेंबर रोजी शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

सेवा संकल्प अभियानांतर्गत आदिवासी समाजातील विद्यार्थी व नागरिकांमध्ये शासकीय योजनांची माहिती, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूरचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे यांनी दिली.

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारताच्या संविधानातील राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वांमधील अनुच्छेद ३९ (क) व ४१ मध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या सुस्थितीसाठी तरतूद करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांना वृद्धापकाळ चांगल्या प्रकारे घालविता यावा, त्यांचे जीवन सुसह्य व्हावे तसेच त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुस्थितीत राहावे, यासाठी राज्य शासनाने ९ जुलै २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये ज्येष्ठ नागरिकांसाठी सर्वसमावेशक धोरण निर्गमित केले आहे.

या धोरणातील तरतुदीनुसार दरवर्षी १ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन' (International Day of Older Persons) म्हणून राज्यात साजरा करण्यात येतो. यानिमित्त जिल्ह्यात विविध जनजागृतीपर व समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त वृत्तपत्रांमध्ये जनजागृतीपर जाहिराती प्रसिद्ध करणे, सार्वजनिक पदयात्रा, प्रभात फेऱ्या, सभा, आरोग्य शिबिरे, चर्चासत्रे व परिसंवाद आयोजित करावेत. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष कार्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यरत असलेल्या बिगर सरकारी संस्थांचा सत्कार व गौरव करण्यात यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेले विविध कायदे व शासनाच्या योजना, त्यांचे हक्क, उपलब्ध सोयी–सुविधा तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी कार्यरत असलेल्या हेल्पलाईन क्रमांक १४५६७ याबाबत व्यापक जनजागृती करण्यात यावी. ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, सुरक्षितता व कल्याण याबाबत समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व संबंधितांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण श्रीमती सोनवणे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# जय भवानी प्रशालेतील जीर्ण इमारतीची महापौर व आयुक्त यांच्याकडून पाहणी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या जय भवानी प्रशालेतील शाळा इमारतीची आज महापौर विनायक कोंड्याल व स्थायी समिती सभापती श्रीमती रंजिता चाकोते, शहर सुधारणा समिती सभापती स्वाती बडगु, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पाहणी केली. यावेळी यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

जय भवानी प्रशालेमध्ये कन्नड माध्यम तसेच मराठी माध्यमाच्या शाळा सुरू असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शाळेच्या इमारतीची पाहणी करण्यात आली. पाहणीदरम्यान इमारतीचा काही भाग जीर्ण व धोकादायक झाल्याचे निदर्शनास आले. सदर इमारत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते, त्यामुळे संबंधित धोकादायक वर्गखोल्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

**नव्याने सहा वर्गखोल्या बांधण्याच्या सूचना**

जीर्ण झालेल्या वर्गखोल्यांच्या ठिकाणी नव्याने सहा वर्गखोल्या बांधण्याबाबत महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. नवीन बांधकामाची कार्यवाही आवश्यक त्या तांत्रिक बाबींची पूर्तता करून लवकरात लवकर सुरू करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

नवीन बांधकाम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होणार नाही, यासाठी आवश्यक त्या तातडीच्या उपाययोजना करण्याचे निर्देशही देण्यात आले. शाळेतील धोकादायक भागाची तातडीने दुरुस्ती करून सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या.

**मैदानातील वॉल कंपाऊंडबाबतही चर्चा**

यावेळी जय भवानी प्रशालेच्या लगत असलेले जिमखाण्याची सुद्धा पाहणी केली या ठिकाणी असलेले जिंकणार लवकरच दुरुस्ती करून सुरू करण्यासंदर्भात प्रयत्न करण्यात येईल यावेळी मैदानाचीही पाहणी करण्यात आली. मैदानाभोवती आवश्यक असलेल्या वॉल कंपाऊंडच्या बांधकामाबाबत चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या तसेच शाळेच्या परिसराच्या संरक्षणाच्या दृष्टीने कंपाऊंड वॉलचे काम आवश्यकतेनुसार करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

तसेच शाळेच्या परिसरात टाकण्यात आलेला आजोरा (कचरा/अनावश्यक टाकाऊ साहित्य) लवकरात लवकर हटविण्याचे निर्देश देण्यात आले. शाळा परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि विद्यार्थ्यांसाठी योग्य ठेवण्याबाबत महापौरांनी स्पष्ट सूचना केल्या.

**विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी मुख्याध्यापकांना सूचना**

महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले की, 'जय भवानी प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वाधिक प्राधान्य आहे. शाळेतील जीर्ण व धोकादायक भागाची तातडीने दुरुस्ती करण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार नवीन सहा वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यात येईल. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा धोका होणार नाही, यासाठी शाळा प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी.'

शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी धोकादायक भागात विद्यार्थ्यांचा प्रवेश होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना मुख्याध्यापकांना देण्यात आल्या. नवीन बांधकाम व दुरुस्तीची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याबाबतही संबंधित विभागाला निर्देश देण्यात आले.

# सोलापूर महानगरपालिकेला ₹१६.४८ लाखांचा आयकर परतावा जमा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेला आर्थिक वर्ष २०२४–२५ चा एकूण ₹१६,४८,५६०/– इतका आयकर परतावा प्राप्त झाला असून सदर रक्कम पालिकेच्या बँक खात्यात जमा झाली आहे. महानगरपालिकेचे कर सल्लागार श्री. अभिषेक विठ्ठल शिरसीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आयकर विभागाने काढलेली सुमारे ₹१९.४६ लाख रुपयांची मागणी पूर्णपणे शून्य करण्यात यश आले आहे.

**प्रकरणाचा तपशील:**

महानगरपालिकेचा आर्थिक वर्ष २०२४–२५ चा ₹१५,१५,१५०/– रकमेचा आयकर परतावा १८ मार्च २०२६ रोजी मंजूर करण्यात आला होता. मात्र, त्यानंतर आयकर विभागाकडून महापालिकेला ₹१९,४६,३२०/– ची मागणी नोटीस प्राप्त झाली.

सदर नोटीसबाबत कर सल्लागारांमार्फत तातडीने कायदेशीर खुलासा व दुरुस्ती अर्ज दाखल करण्यात आला. आयकर विभागाकडे योग्य समन्वय व पाठपुरावा केल्यामुळे विभागाकडून ₹१९,४६,३२०/– ची संपूर्ण मागणी रद्दबातल ठरवून ती (शून्य) करण्यात आली. तसेच मूळ परताव्यासह ₹१,३३,४१०/– इतके व्याज मंजूर होऊन, एकूण ₹१६,४८,५६०/– ची रक्कम महानगरपालिकेच्या खात्यात जमा झाली.

**प्रशासकीय मार्गदर्शन व सहकार्य:**

हे प्रकरण मार्गी लावण्यासाठी महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, मुख्य लेखापाल अधिकारी रत्नराज जवळगीकर मार्गदर्शन लाभले. तसेच आयकर अधिकारी संजय भारद्वाज आणि आयकर विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्री. ढेरे यांचे या प्रक्रियेत विशेष सहकार्य लाभले.

**११ वर्षांत पालिकेला १.९४ कोटींचा थेट लाभ:**

आर्थिक वर्ष २०१३–१४ ते २०२४–२५ या कालावधीत महापालिकेच्या विविध आयकर विषयक क्लिष्ट प्रकरणांमध्ये कर सल्लागारांच्या माध्यमातून प्रभावी बाजू मांडण्यात आली असून, त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेला आतापर्यंत एकूण ₹१,९४,२०,४९०/– इतका भरीव आर्थिक लाभ मिळवून देण्यात यश आले आहे.

# बुडगा जंगम समाज विकास समितीची तालुका व शहर कार्यकारणी जाहीर



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय बुडगा जंगम कल्याणकारी संघ पुरस्कृत, महाराष्ट्र राज्य बुडगा जंगम विकास समितीच्या, माळशिरस तालुका व अकलूज शहर कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. तर बुडगा जंगम समाज विकास समिती, अकलूज शहर शाखेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात, अकलूज नगरपरिषदचे नगरसेवक विलास क्षीरसागर व नगरसेविका मनिषा मोहन तिकोटे, मोहन तिकोटे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी अॅड. कृष्णा सूर्यवंशी, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष शंकर सूर्यवंशी व पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष वेंकप्पा सूर्यवंशी, दत्ता जाधव उपस्थित होते. शाखा उद्घाटन सोहळ्या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी समाजाच्या पुढील वाटचाली संबंधित मार्गदर्शन केले. यावेळी माळशिरस तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

तालुकाध्यक्ष सोमनाथ जाधव (न्यूनोल), उपाध्यक्ष सुरेश बिभुते, सचिव रमेश शांताराम जाधव (न्यूनोल), खजिनदार सौ. कर्णाक्षी जाधव, संपर्क प्रमुख सिद्धू तेली, संघटक बाबुराव गोपाळ जाधव (न्यूनोल), समन्वयक म्हणून, प्रदीप सुरेश सुर्यवंशी नियुक्ती करण्यात आली.

तसेच अकलूज शहर कार्यकारिणीमध्ये, कृष्णा जाधव (न्यूनोल), ज्ञानेश्वर जाधव, दशरथ सुर्यवंशी, अर्जुन बिभुते, संतोष जाधव, बाबुराव मल्लेश जाधव, मल्लिनाथ सितारे, यांचा समावेश आहे.

सदर कार्यक्रमास समाजाचे ज्येष्ठ नागरिक राजाराम शंकर जाधव व शिवाजी सूर्यवंशी, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समाज बांधव व पदाधिकारी यांना अनिल जाधव व रमेश जाधव यांनी मोलाचं मार्गदर्शन केले.

# पुणे पदवीधर, शिक्षक मतदारसंघासाठी शनिवारीही नामनिर्देशन पत्र स्वीकारणार

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर मतदार संघ आणि पुणे विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीकरिता उमेदवारांकडून नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर अशी आहे; येत्या शनिवारी (३ ऑक्टोबर रोजी) सार्वजनिक सुट्टी असली तरी उमेदवारांकडून सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतली जाणार आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली – उगले यांनी दिली आहे.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क – 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) भारतीय क्रिकेटमधील एक माजी फलंदाज, इरफान पठाणचा भाऊ २) आशिर्वाद, नवरा मुलगा ३) पाणी, उदक ४) राजाचे दरबारातील बसण्याचे आसन ५) बंदूक (इंग्रजीत) ६) पाणी पिण्याची तीव्र इच्छा ७) सोने ८) चिखल, राडा ११) एकरूप, तल्लीन १३) शिजवलेला तांदूळ १५) राहुल गांधी यांचे चुलतबंधू १७) कोकणातील भाजपचे आमदार-नितेश ** १९) जहाज २०) स्वामी तिन्ही जगाचा आईविना *** २२) चार आणि तीन मिळून होणारी संख्या २५) शिवसेनेचे महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री २६) जोराची आरोळी (हिंदीत)२९) कर्नाटकातील एक जिल्हा ३१) अहमदनगरचे खासदार-*** विखे ३२) ज्ञान (हिंदीत) ३३) जर उलट लिहा ३५) वायू, पवन ३९) राष्ट्रवादीचे निवडणूक चिन्ह ४१) हनुमानाच्या हातातील शस्त्र ४३) ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे जावई-सदानंद ** ४४) मराठी वर्षातील एक महिना ४५) पारंब्या असलेला वृक्ष ४६) फळ्यावर लिहिण्यासाठी हा वापरतात ४७) पत्र (हिंदीत) ४८) एक हजार कि.ग्रॅ.- एक ** ४९) शरीर, काया

**आडवे शब्द :** १) भारतीय क्रिकेट टीममधून निवृत्त झालेला एक डावखुरा फलंदाज
६) नशीब (हिंदीत)
९) गाण्यातील लय, एक जुना ग्रामीण खेळ-** पारंब्या
१०) बारीकसारीक
१२) एक म्हण-** तो कान पिळी१४) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा
१६) भाकरी थापण्याचे मोठे पात्र १८) शहर
२१) मुंबई लगतचा एक जिल्हा
२३) लहान बाळाला टोचतात ती २४) उत्सवाचा दिवस २५) स्वार्थ, हेतू
२७) उन्हाळ्यातील एक महिना २८) कौरवांची आई ३०) वाईट सवय, तल उलट लिहा ३१) भाजप नेते -*** मुनगंटीवार ३२) अकरा (हिंदीत)
३४) पाकचे एक माजी पंतप्रधान-*** शरीफ ३६) पाण्याचे बाष्परूप ३७) दृष्टी
३८) रांग ४०) छ. शिवरायांच्या राजधानीचा किल्ला
४२) ऋतिक रोशन अभिनीत एक चित्रपट-** - अकबर ४४) आईची बहीण
४६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ४९) तलाव ५०) केळांचा समूह
५१) बेसनाच्या पिठाच्या बुंदीपासून बनवितात तो गोलाकार गोड पदार्थ
५२) भारताचा एक माजी विकेटकिपर-*** मोंगिया

## सुडोकु - 67

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | | | | 8 | | 2 |
| 7 | | | 4 | 2 | 8 | | 9 | 6 |
| 2 | 1 | | | 3 | | 7 | | 5 |
| | 3 | 1 | | | | 9 | 8 | |
| | | | 1 | | | | | 7 |
| 8 | 2 | | 9 | 5 | | | | 3 |
| 3 | | | | | 2 | | 6 | |
| | 8 | 5 | | 7 | 6 | | | |
| 9 | | 2 | 5 | | 1 | 3 | | 8 |

# विठ्ठलराव शिंदे कामगार पतसंस्थेची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना सेवकांची सहकारी पतसंस्थेची सन २०२५-२६ या आर्थिक वषार्ची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता कारखाना कार्यस्थळावर खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे चेअरमन तथा कार्यकारी संचालक डॉ. संतोष डिग्रजे यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज पार पडले.



सभेच्या प्रारंभी कामगार पतसंस्थेचे सभासद सचिन चौगुले यांनी सभेच्या अध्यक्षपदी डॉ. संतोष डिग्रजे यांच्या निवडीची सूचना मांडली. या सूचनेस संचालक चंद्रकांत कुटे यांनी सभासदांच्या वतीने अनुमोदन दिले. त्यानंतर श्रद्धास्थान कै. विठ्ठलराव शिंदे यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे ज्येष्ठ सभासद लक्ष्मण घोडके व तानाजी दोरगे यांच्या हस्ते करण्यात आले.

अहवाल सालात निधन झालेल्या संस्थेच्या सभासदांसह हितचिंतक तसेच शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील दिवंगत व्यक्ती आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेले स्त्री-पुरुष व जवान यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. याबाबतचा श्रद्धांजली ठराव संस्थेचे संचालक तानाजी लोंढे यांनी मांडला.

सभेच्या कामकाजात संस्थेने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. संस्थेचे सचिव उत्तम माळवदकर यांनी १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील विविध विषयांचे वाचन केले. सभेसमोर मांडण्यात आलेल्या सर्व विषयांना उपस्थित सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

यावेळी संस्थेचे चेअरमन तथा कार्यकारी संचालक डॉ. संतोष डिग्रजे यांनी उपस्थित सभासदांना मार्गदर्शन केले. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी संस्थेला 'अ' वर्ग ऑडिट प्राप्त झाल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच या आर्थिक वर्षात संस्थेला १ कोटी ४० लाख ४८ हजार रुपयांचा नफा झाला असून सभासदांना ८ टक्के लाभांश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

पतसंस्थेच्या प्रगतीमध्ये कामगार सभासदांचा मोठा सहभाग असून संस्थेला नावारूपास आणण्यासाठी सभासदांनी दिलेले सहकार्य महत्त्वाचे आहे. भविष्यातही पतसंस्थेच्या प्रगतीसाठी सभासदांनी अशाच प्रकारे सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. संतोष डिग्रजे यांनी केले.

सभेच्या शेवटी संस्थेचे संचालक दिलीप लव्हटे यांनी उपस्थित सभासदांचे आभार मानले. सभेचे सूत्रसंचालन आर. एम. जाधव यांनी केले.

यावेळी कामगार पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन संभाजी थिटे, सर्व संचालक मंडळाचे सदस्य तसेच कारखान्याचे कामगार सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दूध उत्पादकांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात- खा. धैर्यशील मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा थेट परिणाम शेतीबरोबरच पशुधन आणि दूध व्यवसायावर होत आहे. अनेक भागांत जनावरांच्या चाऱ्याचा तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, त्याचा परिणाम दूध उत्पादनावरही जाणवत आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करून जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता करून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केले.



शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघाच्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, संघाचे व्हा. चेअरमन दत्तात्रय भिलारे, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन शंकरराव माने-देशमुख, कार्यकारी संचालक रविराज इनामदार-देशमुख, सेक्रेटरी शामकांत घोडे यांच्यासह संघाचे संचालक, विविध संस्थांचे पदाधिकारी, दूध उत्पादक सभासद, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

खा. धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले की, कोरोना महामारीनंतरच्या काळात दूध व्यवसायासमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या. दूध संकलन, विक्री, बाजारपेठेतील बदल तसेच उत्पादन खचार्तील वाढ यामुळे दुग्ध व्यवसायावर मोठा परिणाम झाला. या कालखंडात दूध उत्पादकांबरोबरच दूध संघांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. संघांना मोठा तोटा सहन करावा लागला. मात्र, या प्रतिकूल परिस्थितीतही दूध उत्पादकांच्या हिताचा विचार करून संघाने विविध उपाययोजना करण्यावर भर दिला आहे. दूध व्यवसायाला अधिक सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या स्थिर करण्यासाठी शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघाने कंडेन्स मिल्क प्लांटची उभारणी सुरू केली आहे. या प्रकल्पामुळे दूध प्रक्रियेला अधिक व्यापक स्वरूप मिळण्याबरोबरच दूध उत्पादक सभासदांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होईल. भविष्यात या प्रकल्पाचा निश्चितच दूध उत्पादक सभासदांना फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी संघाच्यावतीने विविध विभागातील दूध उत्पादक संस्था व सेंटरना पारितोषिक देण्यात आली. सर्वात जादा दूध पुरवठा करणाऱ्या संस्थांमध्ये मळोली दूध संस्था प्रथम, श्री शंकर दूध संस्था सदाशिवनग द्वितीय तर तृतीय कै. अरूणादेवी देसाई दूध संस्था चाकोरे, सर्वात जादा दूध पुरवठा करणाऱ्या सेंटरमध्ये प्रथम शिवामृत कोंडबावी, द्वितीय शिवामृत शिंदेवस्ती मांडवे, तृतीय श्रावणी जावळेवस्ती पिलीव, 1000 लि पेक्षा जादा दूध व जादा दर घेणाऱ्यांमध्ये प्रथम शिवामृत काळमवाडी, द्वितीय शिवामृत मोरोची, तृतीय शिवामृत देशमुखवस्ती इस्लामपूर यांनी पटकाविला. यावर्षीचा जनरल चॅम्पियनशिप पुरस्कार सिद्धनाथ दूध संस्था तामसिदवाडी यांनी पटकाविला.

सभेच्या प्रारंभी विविध दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यासाठी श्रद्धांजली ठराव मांडण्यात आला. हा ठराव संचालक बाळासाहेब पराडे यांनी मांडला. सभेचे प्रास्ताविक संचालक हरिश्चंद्र मगर यांनी केले. सभेतील विविध विषयांचे वाचन कार्यकारी संचालक रविराज इनामदार-देशमुख यांनी केले. वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

# जिल्हा परिषद शाळांना भौतिक सुविधासह दर्जेदार शिक्षणावर भर देणार- सभापती चेतनसिंह केदार सावंत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या भौतिक सुविधांचा दर्जा उंचावून विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या व दर्जेदार शैक्षणिक वातावरणात शिक्षण मिळावे, यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाचे सभापती चेतनसिंह केदार - सावंत यांनी एक अत्यंत अभिनव व स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. जिह्यात भौतिक सुविधांच्या श्रेणीकरणात 'ड' श्रेणीत असलेल्या ५७१ शाळांचा दर्जा सुधारून 'ड' श्रेणीनुसार शाळांची संख्या पूर्णपणे शून्यावर आणण्याचे ठाम उद्दिष्ट या उपक्रमाद्वारे ठेवण्यात आले आहे.




सोलापूर जिल्ह्यातील सुमारे २,७६८ जिल्हा परिषद शाळांचा सविस्तर आढावा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दि. २१ सप्टेंबर रोजी घेतला होता. या बैठकीदरम्यान 'ड' श्रेणीतील शाळांची श्रेणीवाढ करण्यासाठी अंदाजे ६१ कोटी रुपयांच्या अवाढव्य निधीची गरज असल्याचे समोर आले. ही मोठी गरज लक्षात घेऊन केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता, समाजातील सर्व घटकांना आणि दानशूर व्यक्तींना शाळांच्या विकासाशी जोडण्याचा नवोपक्रम आखण्यात आला आहे. केवळ 'ड' श्रेणीतील शाळांचा श्रेणी नुसार शाळांच्या पायाभूत सुविधांच्या गुणवत्तावाढीचा टप्याटप्याने दर्जा सुधारणार.

शाळांच्या भौतिक सुविधा सुधारल्याशिवाय विद्यार्थ्यांना दजेर्दार शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार नाही. त्यामुळे शासनाच्या निधीसोबतच समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग घेऊन 'ड' श्रेणीतील शाळांची संख्या शून्यावर आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याच धर्तीवर आगामी काळात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची माहिती घेऊन त्यांचेही वर्गीकरण करण्यात येईल. अशी प्रतिक्रिया या संदर्भात बोलताना सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण सभापती चेतनसिंह केदार - सावंत यांनी दिली.

**माजी विद्यार्थ्यांना जि. प. शाळेशी जोडणार : सभापती चेतनसिंह केदार सावंत**

जि. प. शाळेतून शिक्षण घेऊन आज उच्च पदांवर कार्यरत असलेल्या तसेच विविध क्षेत्रात यशस्वी झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा शाळास्तरीय मेळावा आयोजित करण्याचा विचार आहे. या माध्यमातूर माजी विद्यार्थ्यांना आपल्या शाळेच्या विकासात योगदान देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे.

# ५०० वृक्षांच्या संगोपनासाठी किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीजचा पुढाकार

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** श्रीक्षेत्र पंढरपूर शहर अधिक हिरवेगार, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी भक्तीसागर ६५ एकर परिसरात ५०० वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या पुढाकाराने आणि पंढरपूर नगरपरिषदेच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड, सोलापूर यांनी ५०० लोखंडी वृक्षसंरक्षक जाळ्या (ट्री गार्ड) देऊन मोलाचे सहकार्य केले. विविध संस्था, प्रशासन आणि पर्यावरणप्रेमींच्या एकत्रित सहभागातून 'हरित पंढरपूर, स्वच्छ पंढरपूर' या संकल्पनेला बळ मिळाले आहे.



पंढरपूर ही संतांची भूमी आणि लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान आहे. आषाढी-कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना आणि भाविकांना भविष्यात सावली मिळावी, शहरातील हरित क्षेत्र वाढावे आणि पर्यावरणाचा समतोल राखला जावा, या उदात्त हेतूने भक्तीसागर ६५ एकर परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. केवळ वृक्ष लावणे नव्हे, तर त्या वृक्षांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करून त्यांना मोठे करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या उपक्रमामध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड, सोलापूर, पंढरपूर नगरपरिषद, SVERI कॉलेज, पंढरपूर, वृक्षदायी संस्था आणि वृक्षप्रेमी ग्रुप, पंढरपूर यांनी सहभाग घेतला. विविध संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांतून पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला नवी दिशा मिळाली आहे.

या कार्यक्रमास किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेडचे COO सी. रमेश, HR विभागप्रमुख ऋषिकेश कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक अमित राठोड, वरिष्ठ अधिकारी नवीन सांगा व त्यांची टीम उपस्थित होती. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे विश्वस्त ह. भ. प. शिवाजी मोरे महाराज, अतुल बक्षी, विनोद साठे, मोहन हौसेकर, SVERI संस्थेचे विश्वस्त डॉ. सूरज रोंगे, जळगावकर महाराज, प्रवीणकुमार घम, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे आणि स्वप्निल मोरे आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

SVERI संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, सचिव डॉ. सूरज रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. मुकुंद पवार, उपप्राचार्य डॉ. मीनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम. एस. मठपती, प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाचे डॉ. अभिषेक एम. एस. व रविराज मधेकर, प्रथम वर्ष विभागप्रमुख व ठरर कार्यक्रम अधिकारी अमोल चौंडे, ENTC विभागप्रमुख डॉ. नीता कुलकर्णी तसेच NSS विभागातील विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात सहभाग घेतला.

वृक्षप्रेमी ग्रुप, पंढरपूरचे ॲड. सुनील वाळुंजकर, सोमनाथ होरणे तसेच वृक्षदायी संस्थेचे रवी सर्वगड आणि त्यांच्या सर्व सदस्यांनी या पर्यावरणपूरक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. याशिवाय विविध संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी, कर्मचारी आणि पर्यावरणप्रेमी नागरिकांनीही सहकार्य केले.

वृक्ष म्हणजे केवळ हिरवळ नव्हे, तर भविष्यातील पिढ्यांसाठी जीवनाचा आधार आहे. आज लावलेले रोप उद्या एखाद्या वारकऱ्याला सावली देईल, एखाद्या भाविकाला विसावा देईल आणि पंढरपूरच्या पर्यावरणाला नवे जीवन देईल. या भावनेतून वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड, पंढरपूर नगरपरिषद, रशएफ्र कॉलेज आणि सामाजिक संस्थांच्या संयुक्त सहकार्याने उचललेले हे पाऊल पंढरपूरला हरित, स्वच्छ आणि सुंदर बनविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

'वृक्ष लावा, वृक्ष जगवा... वारकऱ्यांना सावली द्या आणि हरित पंढरपूर घडवा!' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# पेनूर-पाटकुल 'हर घर जल' योजनेला अखेर वीज जोडणी; पाणीपुरवठा सुरू

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या महत्त्वकांक्षी प्रकल्पामध्ये ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे सुरक्षित व नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या 'जल जीवन मिशन-हर घर जल' योजनेअंतर्गत पेनूर आणि पाटकुल येथील पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले होते. येवती तलावातून या योजनेचे काम पूर्ण होऊन सुमारे सहा महिने झाले होते. मात्र वीज जोडणीअभावी योजना प्रत्यक्ष कार्यान्वित होण्यास विलंब झाला होता. आता वीज जोडणीचे काम सुरू झाल्याने पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाली असल्याची माहिती भाजप मोहोळ तालुका अध्यक्ष रमेश लक्ष्मण माने यांनी दिली.





केंद्र सरकारने 15 ऑगस्ट 2019 रोजी 'जल जीवन मिशन-हर घर जल' या महत्त्वाकांक्षी योजनेची सुरुवात केली. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे सुरक्षित, शुद्ध व नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. गावनिहाय पाणीपुरवठ्याचे नियोजन, उपलब्ध पाणीस्रोत, पाइपलाइन, जलसाठा आणि वितरण व्यवस्था यांचा समन्वय साधून ग्रामीण कुटुंबांपर्यंत पाणी पोहोचविण्याचे काम या योजनेतून केले जात आहे.

पेनूर व पाटकुल येथील पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर वीज जोडणीअभावी प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू होण्यास विलंब झाला होता. आता वीज जोडणीचे काम सुरू झाल्याने नागरिकांना नळाद्वारे पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे 'हर घर नळ, हर घर जल' ही संकल्पना पेनूर व पाटकुल गावांमध्ये प्रत्यक्षात येत असल्याचे रमेश माने यांनी सांगितले.

दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या पुढाकारातून आणि सहकार्यातून पेनूर गावाच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून, ह्यहर घर जल' योजनेच्या कामातही त्यांचे योगदान व श्रेय असल्याचे रमेश लक्ष्मण माने यांनी नमूद केले. गावातील विविध विकासकामांना त्यांच्या माध्यमातून चालना मिळत असल्याचा दावाही त्यांनी केला.

पालकमंत्र्यांनी लक्ष घालून जिल्ह्यातील सर्व जलजीवन योजना मिशन चालू करण्याचे निर्देश प्रशासना ला दिले आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येक गावातील योजना कार्यान्वित होत आहेत. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून पालकमंत्री जयकुमार गोरे माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनासाठी मोहोळ तालुक्यासह पेनुर, पाटकुल परिसरामध्ये कोट्यावधी रुपयांची विकास कामे करण्यात आलेली आहेत. याच पार्श्वभूमीवर 'पेनूर आणि पाटकुल येथील नागरिकांना नळाद्वारे नियमित पाणी उपलब्ध होणे ही समाधानाची बाब आहे. 'हर घर जल'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांची पाण्यासाठीची गैरसोय कमी होण्यास मदत होईल,' असे रमेश माने यांनी सांगितले.

— **रमेश माने,** तालुकाध्यक्ष, मोहोळ दक्षिण भाजपा

# अक्कलकोट येथील शेतकाऱ्याच्या शेतातुन ०१ कोटी ०५ लाख, ५५ हजार रुपए किंमतीचा गांजा जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पोलीस अधीक्षक, अतुल कुलकर्णी (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक, विजय कबाडे, यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सोलापूर जिल्हयात अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहिम राबवून कारवाई करणेबाबत आदेशित केले होते. त्याप्रमाणे अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे कडील सपोनि प्रशांत बधे यांचे विशेष पथक नेमूण सदर पथकास कारवाई करणेबाबत आदेश दिले होते.



दिनांक २८/०९/२०२६ रोजी सपोनि प्रशांत बधे व त्यांचे पथक अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे हद्दीतील करजगी दुरक्षेत्र येथे पेट्रोलींग करीत असताना, गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीशिर बातमी मिळाली की, मौजे आळगी ता. अक्कलकोट जि. सोलापूर येथील शेतकरी आपल्या शेतातील ऊसाच्या पिकामध्ये गांजा सदृष्य वनस्पतीची लागवड केले असलेबाबत माहिती मिळाली. त्यावेळी मिळालेल्या बातमी प्रमाणे विनोद घुगे, पोलीस निरीक्षक अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे यांनी सदरची माहिती हि राजेंद्र टाकणे सो, उपविभागीय पोलीस अधिकारी, अक्कलकोट विभाग अक्कलकोट यांना कळवुन त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे कारवाई करणेकरीता विनोद घुगे, पोलीस निरीक्षक, अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे, सपोनि प्रशांत बधे व त्यांचे पथक कारवाई करणेकरीता गेले असता आरोपी नामे मलप्पा गुरुबाळप्पा गड्डी उर्फ बिराजदार वय वय ६० वर्ष रा. शेगाव ता. अक्कलकोट जिल्हा सोलापुर यांच्या ऊसच्या शेतामध्ये पोलीसांनी पाहणी केली असता शेतातील ऊसाच्या पिकामध्ये ठिकठिकाणी अंदाजे १२ फुट उंचीची मोठी गांजा सदृश्य झाडांची लागवड केल्याचे दिसून आले. ते पचनाम्याअंतर्गत जप्त केले असता आरोपी यांच्या उसाच्या शेतामध्ये एकुण २४० गांजाची झाडे मिळुन आली पैकी २१० जिवंत गांजाची झाडे व वाळलेली ३० गांजाची झाडे होती. त्याचे वजन केले असता २११ किलो १०० ग्रॅम वजनाचे आढळुन आले. सदर जप्त करण्यात आलेला गांजाचा मुद्देमालाची अदांजे किंमत ०१ कोटी ०५ लाख ५५ किंमतीचा मिळून आल्याने अंमली पदार्थ गुन्हयाचेकामी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणेचे सपोनि प्रशांत बधे यांनी जप्त करून कारवाई करुन सदरबाबत अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे येथे गुरंन ५३१/२०२६, अंमली पदार्थ व मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून सदर गुन्हयाचा तपास अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणेचे सपोनि प्रशांत बधे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक, विजय कबाडे, राजेंद्र टाकणे, उपविभागीय पोलीस अधिकारी, अक्कलकोट विभाग अक्कलकोट सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे प्रभारी श्री विनोद घुगे यांचे नेतृत्वाखाली अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक प्रशांत बधे, पोसई राजशेखर निंबाळे, पोहेकॉ/१५३४ मोसलगी, पोहेकॉ/४९६ चिंचोळकर, पोकॉ/९७० कोळी, पोकॉ/६९ धुमाळ, पोकॉ/१३१६ डोंगरीतोट, मपोकॉ/२१७० हडपद, चामपोकॉ/५६ धनगर, पोकॉ/८८६ कोळी, पोकॉ/७२१ सुर्यवंशी, पोहेका /१४५५ पाटील, पोहेकॉ/१७८६ बिराजदार, पोका / १९५३ अन्सारी, पोकॉ/७६२ शिंदे, पोकॉ/२९६ पवार, पोकॉ/१३१६ डोगरीतोट, पोकॉ/१५२८ माने, पोना/५८१ कोले यांनी बजावली आहे.

# शॉर्टसर्किटने शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कष्टावर पाणी



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील कोर्टी येथे शॉर्टसर्किटमुळे शेतातील तब्बल एक एकर ऊस जळून पूर्णपणे खाक झाल्याची घटना घडली आहे. येथील शेतकरी नबीलाल हुसेन नदाफ यांच्या शेतातील ऊसाला अचानक आग लागल्याने काही वेळातच संपूर्ण ऊस जळून गेला. या घटनेत नदाफ यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

कोर्टी परिसरातील शेतात नबीलाल नदाफ यांनी एक एकर क्षेत्रावर ऊसाची लागवड केली होती. ऊसाची वाढ चांगली झाल्याने यंदाच्या गळीत हंगामात या क्षेत्रातून ७० टन एकरी उत्पादनाची अपेक्षा होती. मात्र, शेतातून गेलेल्या वीजवाहिनीतील शॉर्टसर्किटमुळे अचानक ठिणगी पडून ऊसाला आग लागल्याचे सांगण्यात येत आहे.

आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. ऊसाचे पीक पूर्णपणे उभे जळून खाक झाल्याने शेतकऱ्याच्या वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले. ऊस जळाल्याने अपेक्षित उत्पादन तर हातचे गेलेच, शिवाय लागवडीसाठी झालेला खर्चही वाया गेला आहे.

ऊस जळाल्याची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत मोठ्या प्रमाणात ऊस जळून गेला होता.

वीजवाहिन्या, खांब व विद्युत उपकरणांमध्ये बिघाड होऊन शेतातील पिकांना आग लागण्याच्या घटना अधूनमधून घडत आहेत. त्यामुळे महावितरणने ग्रामीण भागातील वीजवाहिन्या व विद्युत यंत्रणेची पाहणी करून धोकादायक ठिकाणांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

शॉर्टसर्किटमुळे ऊस जळून झालेल्या नुकसानीची संबंधित विभागाने पाहणी करून पंचनामा करावा आणि नदाफ यांना शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.



# महावितरणच्या योजनांची विद्यार्थ्यांना माहिती व योजने विषयी चर्चासत्र

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) यांच्या सहकार्याने ह्यवीज ग्राहकांसाठी विविध योजनाह्व या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

यावेळी नातेपुते विभागीय महावितरणचे कार्यकारी अभियंता खिलारे यांनी वीज ग्राहकांसाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. यामध्ये ह्यमागेल त्याला सौर कृषी पंपह्न, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन, पीएम सूर्यघर मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आदी योजनांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महावितरणचे कनिष्ठ अभियंता निकम यांनी ऊर्जा बचतीचे महत्त्व स्पष्ट करताना वीज वापरताना कोणत्या उपाययोजना कराव्यात, कोणत्या गोष्टी टाळाव्यात तसेच विद्युत सुरक्षेबाबत कोणती खबरदारी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवानराव साळुंखे यांनी स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी ऊर्जा बचतीबाबत जागरूक राहून समाजामध्येही ऊर्जा बचतीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. जगदीशचंद्र मुळीक व प्रा. उत्तम सावंत यांनी केले.

कार्यक्रमास इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर अभिजीत काळे, प्रा. डॉ. कमल कांबळे, प्रा. अमर वाघमोडे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सतीश पाटील, प्रा. सौरभ सावंत, प्रा. पंकज कोडलकर, कार्यालयीन कर्मचारी एच. टी. वाघमोडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.